महावितरण

# जाहीर सूचना

महा.राज्य वि.वि.कं.मर्या. अचलपूर विभागा अंतर्गत सत्र २०२३.२४ करीता ऑनलाईन पध्दतीने खालील व्यवसायाकरीता शिकाऊ उमेदवारांची प्रशिक्षणाकरीता निवड करावयाची आहे.

विजतंत्री (Electrician) ३२, तारतंत्री (Lineman) ३० व कोपा-पासा - ११ एकुण -७३

शैक्षणीक अर्हता :- (१) म.राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ १०२ बंधामधील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.(२) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन विजतंत्री, तारतंत्री व कोपा-पासा व्यवसायात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अथवा महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ MSBTE या बोर्डाचा डिप्लोमामार्फत इलेक्ट्रिशन दोन वर्ष अभ्यासक्रम समकक्ष असल्यामळे विजतंत्री व तारतंत्री शिकाऊ उमेदवार सुध्दा अर्ज करण्याकरीता पात्र समजण्यात येईल.

अटी व शर्ती (१) उमेदवाराचे वय १८ वर्ष पूर्ण असणे आवश्यक व कमाल ३० वर्ष असावे तसेच राखीव उमेदवाराकरीता वयाची अट ०५ वर्ष शिथिलक्षम राहील त्या करीता उमेदवाराने राखीव गटातील जातीचे प्रमाणपत्र करणे बंधनकारक राहील. (२) सदर उमेदवार हा अमरावती जिल्ह्यातील रहिवासी असावा ;आधारकार्ड मधील पत्त्यानुसार) (३) अमरावती जिल्ह्याच्या व्यतिरिक्त इतर जिल्ह्यातील अर्जाचा विचार करण्यात येणार नाही (४) ऑनलाईन अर्ज करतांना एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रीकामध्ये नमुद केलेले नाव व जन्मतारीख हे आधार कार्डवर नमुद असलेल्या नावाशी व जन्मतारखेशी सुसंगत असावे, तसेच ई.मेल आयडी, भ्रमणध्वनी क्रमांक, अचुक नमुद करावा (५) प्रशिक्षणाचा कालावधी १ वर्ष राहिल. (६) संगणक प्रणाली मार्फत सादर करण्यात आलेल्या ऑनलाईन नोंदणी अर्जाची प्रत, शैक्षणिक मुळ कागदपत्रे, (ITI उत्तीर्ण चारही सेमीस्टर गुणपत्रीका सांक्षाकित करुन या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. (७) ईच्छुक व पात्र उमेदवारानी **www.apprenticeshipindia.org** या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज जाहिरातीच्या दिनांकापासून ते १५.०१.२०२४ पर्यंत अचलपुर विभागाचा आस्थापना क्रमांक E10162701548 यावर योग्य व पुरीपुर्ण माहितीसह सादर करणे आवश्यक आहे. विहित मुदतीत अर्ज प्राप्त न झाल्यास तद्‌नंतर सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. (८) कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. विभागीय कार्यालय, सिव्हिल लाईन, परतवाडा ता.अचलपूर जि.अमरावती येथे दि १६.०१.२०२४ ते दि २५.०१.२०२४ पर्यत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.३० पर्यत अर्ज स्वत: उमेदवाराने सादर करणे आवश्यक आहे. (९) शिकाऊ उमेदवार यांची निवड आय.टी.आय. चे गुण विचारात घेवून केवळ गुणवत्तेनुसार निवड यादी तयार करुन शिकाऊ उमेदवाराची निवड करण्यात येईल (१०) जाहिरातीमध्ये अंशत: बदल किंवा संपुर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार कंपनी राखून ठेवीत आहे.

कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.कं.मर्या.अचलपूर विभाग

पी.आर.ओ.नं. १०१